सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

कृषि विभाग

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

३० अ/ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com

जा क्र. नादेकृसंप्र/स.शास्त्र/तक्रार निवारण /ग्रा.कृ.सं.स / प्र.क्र.१५७ /२०१९/६२६ दिनांक : १० /०९/२०१९

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत**
**पारदर्शकता,जबाबदारी व तक्रार निवारण धोरण**

## परिपत्रक

जागतिक बँक आणि केंद्र व राज्य शासनाचे पारदर्शकता,जबाबदारी व तक्रार निवारण धोरणाच्या विविध नियमांच्या अधीन,नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत पारदर्शकता,जबाबदारी व तक्रार निवारण धोरण याबाबत प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिकेतील कलम ६.४.३.अन्वये तक्रार निवारण धोरण राबविण्यात येत आहे,याबाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे -

## पारदर्शकता, जबाबदारी व तक्रार निवारण

### पारदर्शकता

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व बाबींचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी प्रकल्प कटिबद्ध आहे. यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या वतीने खालीलप्रमाणे विविध बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे -

**(i) प्रकल्प संकेतस्थळाचा वापर**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाने www.mahapocra.gov.in संकेतस्थळ विकसित केलेले आहे. या संकेतस्थळावर प्रकल्पाची उद्दिष्टये ,प्रकल्प अंमलबजवणीची दिशा, प्रकल्प अंमलबजावणी विषयक विविध पुस्तिका, अंमलबजावणीविषयक धोरण, उपलब्ध निधी आणि खर्च, प्रकल्पांतर्गत राबवावयाचे विविध घटक इत्यादीची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे . हे संकेतस्थळ वेळोवेळी अद्यावत करण्यात येते .

**(ii) प्रकल्प कार्यालये**

**अ. राज्यस्तरीय:-** मुंबईमध्ये स्थित प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील प्रशासकीय शाखेकडून विविध शाखांद्वारे घेतलेल्या सर्व निर्णयांचे योग्य दस्तऐवजीकरण करण्यात येते.

प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या वतीने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना लेखी स्वरूपात निर्गमित केल्या जातात व ई मेल तथा पत्राद्वारे कळविण्यात येतात.

**आ. जिल्हास्तरीय:-** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी करिता जिल्ह्यास्तरीय प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर कक्षाच्या माध्यमातून उपविभाग स्तरावर,तसेच गावस्तरावरील अंमलबजावणीविषयक कामांचे सनियंत्रण व समन्वय करण्यात येते.जिल्हा स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी विषयक सर्व बाबींचे दस्ताऐवज ठेवण्यात येतात. उदा-आवक जावक नोंदवही इ.

**इ. उपविभागीय स्तरः-** उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय हे उपविभाग स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी कक्ष आहे. सदर कक्षाच्या माध्यमातून उपविभाग स्तरावरून गावस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचे सनियंत्रण करणे व समन्वय साधणे ही जबाबदारी

पार पाडण्यात येते. उपविभाग स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी विषयक सर्व बाबींचे दस्तऐवज ठेवण्यात येतात उदा - आवक-जावक नोंदवही इ.

ई. **गावस्तरावर:-** गावस्तरावर प्रकल्पाच्या प्रचार व प्रसिद्धी करीता प्रकल्प अंमलबजावणीचे घटक, गावामधील ग्राम कृषि संजीवनी समितीची संरचना, गावाचा पाण्याचा ताळेबंद इ फलक प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावांमध्ये लावणे अपेक्षित आहे. संबधित गावांमध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रियेद्वारे,तसेच प्रकल्प माहितीपत्रिका,तसेच प्रकल्प माहिती पुस्तिका व इतर प्रकाशने द्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हा / तालुका / गाव पातळीवर क्षमता बांधणी कार्यक्रमांतर्गत आवश्यकतेनुसार प्रकल्प अंमलबजावणी संबधित प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

उ. प्रकल्प अंमलबजावणीच्या सर्व स्तरांवर माहितीचा अधिकार अधिनियम सन २००५ लागू आहे .

## जबाबदारी

प्रकल्पात कार्यरत सर्व अधिका-यांना प्रकल्प राबविण्यासाठी कर्तव्ये व जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या विहित उद्दिष्टांच्या आधारे काम पूर्ण करण्याची सर्व प्रकल्प अधिका-यांची जबाबदारी आहे. प्रकल्पाच्या कामात कुचराई अथवा विलंब झाल्यास संबधित अधिका-यावर याची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

## तक्रार निवारण

(i) प्रकल्प अंमलबजावणी विषयक काही तक्रार असल्यास, संबधित व्यक्ती ई मेल द्वारे mahapocra@gmail.com या ई मेल आयडी वर आपली तक्रार नोंदवू शकतो अथवा खालील पत्त्यावर पोस्टाद्वारे तक्रार नोंदविता येते. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, ३० अ/ब आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई ४००००५ .

(ii) सीएम हेल्पलाईन (CM Helpline) साठी टोल फ्री नंबर १८००१२०८०४० दिनांक १ एप्रिल २०१९ पासून कार्यरत आहे. नागरिकांचे प्रश्न आणि समस्या जाणून घेणे व ते सोडविणे या उद्देशाने ही सुविधा २४/७ उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(iii) प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्तरावर (०२२) २२१६३३५१, (०२२) २२१६३३५२ या संपर्क क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्यात साधून प्रकल्पात अंतर्भूत बाबीबाबत तक्रार नोंदविता येते.

(iv) जिल्हास्तरावर,तक्रार निवारणासाठी संबधित जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयास ई मेल किंवा टेलिफोन द्वारे कार्यालयीन वेळेत अथवा पोस्टाने संपर्क साधना येते, त्याचप्रमाणे उपविभाग स्तरावर तक्रारीसाठी संबधित उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा.

(v) **ग्राम स्तरावर**

अ. गाव पातळीवरील सर्व तक्रारींचे निवारण करण्याची जबाबदारी संबधित ग्राम कृषि समितीची राहील, ग्राम कृषी संजीवनी समिती काही तक्रारींचे निराकरण करु न शकल्यास ते ग्रामसभेमध्ये करण्यात यावे. यासाठी गावक-यांना गाव स्तरावर विस्तार कार्य प्रेरक कृषीमित्र/कृषि ताई व समूह सहाय्यक हे मदत करतील.

आ. ग्रामसभेमध्ये तक्रार निवारण होत नसल्यास,सदर तक्रार ही संबधित ग्रामसभेच्या मान्यतेने उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात येईल याकरिता उपविभागीय स्तरावर ५ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात येईल,यामध्ये संबधित उपविभागीय कृषि अधिकारी, एक संबंधित तांत्रिक सदस्य (शक्यतो ठिकाण आणि तक्रारीशी परिचित असलेला) व संबधित ग्रामसभेने नामनिर्देशित केलेला एक व्यक्ती यांचा समावेश असेल.

इ. तक्रारीत एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा समावेश असल्यास, संबधित उपविभागीय कृषी अधिकारी हे तक्रार निवारण करतील.

ई. उपविभागीय कृषि अधिकारी यांचा निर्णय संबधितास मान्य नसल्यास,याबाबत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचेकडे अपील करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम आणि सर्व पक्षांवर बंधनकारक असेल.

उ. ग्राम कृषि संजीवनी समिती/ ग्रामपंचायत स्तरावर लेखी तक्रारी, संबंधित ग्रामपंचायतीत सार्वजनिक ठिकाणी ठेवलेल्या सीलबंद पेटीमध्ये टाकला येईल. ग्राम कृषि संजीवनी समिती व समूह सहायक यांच्या उपस्थितीत ठराविक तारखेला ही तक्रार पेटी उघडण्यात येईल व प्राप्त तक्रारींवर चर्चा केली जाईल आणि त्यांचे निराकरण १५ दिवसाच्या कालावधीमध्ये करण्यात येईल.जर ग्राम कृषि संजीवनी समिती तक्रारींचे निराकरण करण्यास असमर्थ असतील तर ग्रामसभा तक्रारीचे निवारण करेल.

ऊ. ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर तक्रार नोंदणीसाठी पोस्टाद्वारे/ई मेल द्वारे सुद्धा संपर्क साधता येईल. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या बैठकीत व ग्रामसभेमध्ये चर्चेदरम्यान देखील संबंधित व्यक्ती तक्रार नोंदवू शकते.

**(vi) ग्राम स्तरावर उपलब्ध अन्य वैधानिक यंत्रणा**

अ. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (Bombay Act No. III of १९५९) नुसार तक्रार निवारणासाठी अंतर्भूत तरतुदी व ग्रामपंचायतींसाठी भारत सरकार / महाराष्ट्र सरकारचे सर्व प्रचलित नियम प्रकल्प क्षेत्रात लागू राहतील.

आ. प्रकल्पाशी सर्व तक्रारी ग्राम कृषि संजीवनी समितीने विचारात घेतल्या पाहिजेत आणि त्यावर अंतिम निर्णय ३० दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे.

इ. सर्व ग्रामसेवकांना -सार्वजनिक माहिती अधिकारी॰ म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयस्तर ,उपविभाग स्तर व गावस्तरावर ग्राम कृषि संजीवनी समितीस्तरावर वरीलप्रमाणे सर्व प्राप्त तक्रारींचे निराकरण होत असल्याची खात्री संबधित कार्यालय प्रमुखाने करणे आवश्यक आहे. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी आपले अधिनस्त सर्व उपविभागीय कृषि अधिक-यांना ग्रामपंचायत/ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर शेतकऱ्यांच्या सूचना व तक्रार निवारण करण्यासाठी एक सूचना / तक्रार पत्र पेटी ठेवणेबाबत निर्देश द्याव्यात. याबाबतचे सविस्तर विवेचन खालीलप्रमाणे आहे -

## सूचना / तक्रार पत्र पेटी

१.ग्रामपंचायत/ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर शेतकऱ्यांच्या सूचना व तक्रार निवारण करण्यासाठी एक सूचना / तक्रार पत्र पेटी दर्शनी भागात, सोयीस्कर व सुरक्षित जागेवर ठेवावी.

२.सदर सूचना/तक्रार पत्र पेटी दर १५ दिवसांनी ग्राम कृषि संजीवनी समितीच्या सदस्यांसमोर समूह सहाय्यक यांनी उघडावी व प्राप्त झालेल्या पत्रांची विषयवार तसेच दिनांकासह नोंद सूचना / तक्रार नोंदवही मध्ये घ्यावी. सूचना/तक्रार पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यावर पाठपुरावा करुन एक महिन्यांच्या आत योग्य ती कार्यवाही करावी.

३.सूचना / तक्रार पत्र पेटीचा खर्च ग्राम कृषि संजीवनी समितीस्तरावर उपलब्ध निधीमधून करावा. सूचना / तक्रार पत्र पेटी लावण्यासाठी रु. १५००/- खर्च मर्यादा निर्धारित करण्यात येत आहे.

- सूचना / तक्रार पत्र पेटी ही टिकाऊ असल्याची खात्री करावी.
- पेटीस ग्राम कृषि संजीवनी समिती कार्यालयाच्या भिंतीवर लावण्यासाठी हूक असावा.
- सूचना / तक्रार पत्र पेटीला कुलुप लावण्याची सुविधा असावी.
- सूचना / तक्रार पत्र पेटी हिरव्या रंगाची असावी.
- सूचना / तक्रार पत्र पेटीवर प्रकल्पाचे नाव-

  "नानाजी देशमुख कृषि संजीवनी समिती

  सूचना / तक्रार पत्र पेटी- ग्रामपंचायत नाव- ............

सूचना / तक्रार पत्र नोंदवही खालील प्रमाणे असावी-

| अनु. क्र. | सूचना/ तक्रार कर्त्याचे नाव | सूचना / तक्रारीचा प्रकार | | | | सूचना / तक्रार प्राप्त झाल्याचा दिनांक | तपशील | जबाबदार अधिकारी / संस्था | सूचना / तक्रार निवारण झाल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकल्पा संबंधीत | प्रकल्प कर्मचारी संबंधीत | लिंग संबंधीत भेदभाव | इतर | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

(विकास चंद्र रस्तोगी)
प्रकल्प संचालक

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी -**

१.जिल्हाधिकारी (प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व जिल्हे)

२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व जिल्हे)

३. प्रकल्प संचालक,आत्मा (प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व जिल्हे)

४.उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व जिल्हे)

५.लेखा अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय / उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय (प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व १५ जिल्हे व ३६ उपविभाग).

६.प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील सर्व विभाग प्रमुख व विशेषज्ञ.

७.संबधित निवड नस्ती .